# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७ / चैत्र ८, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

### कन्नडहून-धुळयाकडे जाणारे तांदळाचे दोन ट्रक पोलिसांनी जप्त केल्याबाबत

**(१) * २९६४३ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नडहून-धुळयाकडे काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणारे सुमारे पावणेसात लाख रुपयांचा ६४९ तांदळाच्या गोण्यांनी भरलेले दोन ट्रक पोलिसांच्या डी.बी. पथकाने दिनांक २६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

चाळीसगाव-औरंगाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ वरील टोल नाक्याजवळ दिनांक २४/०५/२०१६ रोजी सदरील कारवाई करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी दिनांक २४/०५/२०१६ रोजी चाळीसगाव शहर पोलीस स्टेशन येथे भाग-६ गु.र.नं. ३०५४/२०१६, सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश २००१ चे कलम ६ (४) चे उल्लंघन कलम ९ व कलम ३ व ७ जीवनावश्यक वस्तू कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात ५ आरोपी निष्पन्न झाले असून ४ आरोपींना अटक करण्यात आली व १ आरोपीस अटकपूर्व जामिन मंजूर आहे. सदर प्रकरणी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, चाळीसगांव यांच्याकडे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील गायकवाड पाड्यात गोळीबारात एका मुलाचा मृत्यू झाल्याबाबत

**(२) * २९०६९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील गायकवाड पाड्यात बारशाच्या कार्यक्रमात पहाटे २ वाजता डीजेच्या गाण्यांवर नाचत बंदुकीतुन हवेत गोळीबार करीत असताना बंदुकीतुन सुटलेली गोळी प्रतिक गायकवाड या १२ वर्षे वयाच्या मुलाच्या छातीत घूसून त्याचा मृत्यू झाल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आनंदाच्या भरात गोळीबार करणाऱ्यांवर व मुलाच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, बंदुकीतुन हवेत गोळीबार करणाऱ्यांकडे शस्त्र परवाना होता काय व स्व:संरक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शस्त्र परवान्याचा गैरवापर केल्यामुळे संबंधितांचा शस्त्र परवाना रद्द करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून मृत मुलाच्या पालकांना आर्थिक मदत करण्यात आली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी आरोपींविरुध्द शिवाजीनगर पो.स्टे.येथे गुरनं. २५/२०१७ भादंवि कलम ३०४ (II), २०१, ३४ सह भा.ह.का. ३, २५ मु.पो.का. कलम ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद असून गुन्ह्यातील ६ आरोपींपैकी ४ आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली असून इतर २ आरोपींना अटक होणे बाकी आहे.

सदर प्रकरणातील आरोपींकडे शस्त्र परवाना नव्हता.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मिरारोड येथील आरएनए ब्रॉडवे एव्हेन्यु गृह संकुलातील क्लब हाऊस व तरण तलाव रहिवाश्यांना हस्तांतरीत करण्याबाबत**

**(३) * २८१३५ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरारोड येथील आरएनए ब्रॉडवे एव्हेन्यु गृह संकुलातील रहिवाशांना क्लब हाऊस व तरण तलावाचा विकास नियंत्रण नियमावलीनुसार १५ दिवसात विनामुल्य हस्तांतरीत करण्याचे पत्र महानगरपालिकेने देवूनही विकासकाने रहिवाशांना क्लब हाऊस व तरण तलाव हस्तांतरीत केला नसल्याचे दिनांक ०४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्लब हाऊस व तरण तलावाकरिता गृह संकुलातील ८५० रहिवाशांनी आजीव सभासदत्वासाठी रुपये २५ हजार इतके शुल्क भरूनही विकासकाने रहिवाशांना ताबा दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर गृह संकुलातील क्लब हाऊस व तरण तलाव गृह संकुलातील रहिवाशांना हस्तांतरीत करण्याबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दिनांक १७/०९/२०१६ रोजी संबंधितांची सुनावणी घेतली. या सुनावणीअंती सदर क्लब हाऊस व तरण तलाव विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम २२ नुसार १५ दिवसांत सोसायटीस हस्तांतरीत करण्याबाबत संबंधित विकासकास महानगरपालिकेकडून निर्देश देण्यात आले.

त्यानुसार उक्त क्लब हाऊस व तरण तलाव सोसायटीच्या फेडरेशनला हस्तांतरीत केल्याचे संबंधित विकासकाने दिनांक १९/१०/२०१६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले आहे.

सद्यस्थितीत सदर क्लब हाऊस व तरण तलाव संबंधित सोसायटीच्या ताब्यात असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) शहराला लागून असलेल्या खाडी किना-याचा विकास करण्याबाबत

**(४) * २८१३१ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) शहराला लागून असलेल्या विस्तृत खाडी किना-याचा विकास करण्यासाठी कल्याण-गणेशघाट ते गंधारे पुलापर्यंतच्या परिसराचे सर्वेक्षण करून या ठिकाणी राबविण्यात येणा-या प्रकल्पाचा विकास आराखडा तयार करण्याबाबत संबंधिताना निर्देश द्यावेत व त्यासाठी या परिसराचे सर्वेक्षण करण्याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला निर्देश देण्याबाबत विनंती करणारे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मा.मुख्यमंत्री, मा.बंदरे विकास राज्यमंत्री यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत गणेशघाट ते वाडेघरपर्यंत संरक्षण भिंत, जेट्टी व पोचरस्ता तयार करण्यासाठी ४५० मीटर पर्यंत काम सुरु करण्यात आले आहे. सदर काम एप्रिल, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तसेच या पुढील कामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत जिल्हा नियोजन समिती ठाणे यांच्याकडे प्रस्ताव तयार केला आहे. त्यानुसार २०१७-१८ या आर्थिक वर्षात निधी उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मोनो रेल्वे सेवेची भाडेवाढ रद्द करण्याबाबत**

**(५) * ३००६२ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पूर्व उपनगरात असलेल्या मोनो रेल्वे सेवेत भाडेवाढ करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील भाडेवाढीस नागरिकांनी विरोध दर्शविला असल्याने सदर भाडेवाढीचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांची पेन्शन प्रलंबित असल्याबाबत**

**(६) * २७०१९ श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतलेल्या सैनिकांना जिल्हा गौरव समितीच्यावतीने शासनाकडून पेन्शन देण्यात येत असलेली प्रकरणे सन २००२ पासून निर्णयाअभावी शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी सन १९४२ ते १९४४ च्या स्वातंत्र्य काळात गावोगावी फिरून इंग्रजांविरुध्दच्या लढ्यात भाग घेतलेले श्री.गुलाबराव जगदेवराव अढाव रा.प्रिंप्री अढाव मलकापूर या भूमिगत स्वातंत्र्य सैनिकाला स्वातंत्र्य सैनिक जिल्हा गौरव समितीच्यावतीने पेन्शन मिळण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे सन २००२ पासून वारंवार लेखी निवेदनाद्वारे अर्ज विनंत्या करून तसेच अलिकडेच दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे एका सामाजिक संस्थेने लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने सन १९९५ च्या शासन निर्णयानुसार स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन उपलब्ध करुन देणेबाबत कोणती प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) श्री.रुपेश कीर, प्रतिनिधी समर्थन, जि.पालघर यांनी श्री.गुलाबराव जगदेवराव अढाव यांना स्वातंत्र्य सैनिक पेन्शन अदा करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना उद्देशून दिनांक २३/१/२०१७ चे निवेदन सादर केले आहे.

श्री.गुलाबराव जगदेवराव अढाव यांनी स्वातंत्र्य सैनिक पेन्शन मिळणेसाठी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी जिल्हा गौरव समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव दिनांक ३१/८/२००२ च्या पत्रान्वये शासनाकडे पाठविला होता. सदर प्रस्ताव शासन निर्णय दिनांक ४/७/१९९५ अन्वये भूमिगत स्वातंत्र्य सैनिक प्रवर्गासाठी विहित केलेल्या निकषांनुसार तपासला असता, सदर निकषांनुसार पुराव्याच्या कागदपत्रांची पूर्तता होत नसल्यामुळे स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीने प्रस्ताव ना मंजूर केला आहे. सदर नामंजूरीचा निर्णय अर्जदार श्री.अढाव व जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना शासन पत्र क्र.पीओएस-१२०३/प्र.क्र.७२/०२/स्वासैक-३, दिनांक १०/२/२००४ कळविण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक १८/४/२०१५ मधील अ.क्र. (५) नुसार मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने एकदा स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन नामंजूरीचा निर्णय घेतल्यानंतर कोणताही नवीन पुरावा अर्जदाराने सादर केल्याशिवाय त्यांचे प्रकरण उच्चाधिकार समितीसमोर ठेवण्यात येऊ नये अशी तरतूद आहे. सदर तरतुद विचारात घेता दिनांक २३/१/२०१७ रोजीच्या निवेदनासोबत नव्याने कोणताही पुरावा सादर केलेला नसल्यामुळे श्री.अढाव

यांच्या स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन प्रकरणाचा पुनर्विचार करण्यात आला नाही. सदर बाब श्री.रुपेश कीर व श्री.अढाव यांना शासन पत्र क्र.पीओएस-१२०३/प्र.क्र.७२/०२/स्वासैक-३, दिनांक १/३/२०१७ अन्वये कळविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड नगरपालिकेतील कंत्राटी कर्मचा-यांचे थकीत वेतन देण्याबाबत**

**(७) * ३०५५४ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहराला पाणीपुरवठा करणा-या माजलगांव बॅक वॉटर योजनेवरील कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन सात महिन्यांपासून नगरपालिका कंत्राटदाराकडे थकीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कर्मचाऱ्यांची थकीत वेतनासाठी उपोषणाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) माहे ऑगस्ट, २०१६ ते जानेवारी, २०१७ या ६ महिन्यांचे बीड शहर पाणीपुरवठा योजनेत कार्यरत कंत्राटी कामगारांचे वेतन थकीत होते.

वेतन थकीत असल्याने उपोषणाबाबतचे निवेदन संबंधित कर्मचाऱ्यांनी दिनांक ०३/०२/२०१७ अन्वये दिलेले होते.

माहे डिसेंबर, २०१६ पर्यंतचे थकीत वेतन कंत्राटदाराने कामगारांना दिनांक १०/०२/२०१७ रोजी अदा केले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्षात उपोषणाचा मार्ग स्वीकारलेला नाही.

सदर कामगारांचे वेतन पुढील कालावधीत नियमितपणे अदा करण्यासंदर्भात दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, बीड व मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील खाजण जमिनींवर परवडणारी घरे उभारण्याच्या प्रस्तावाबाबत

**(८) * २९१७६ श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खाजण जमिनींवर परवडणारी घरे उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विचाराधीन असलेल्या उक्त प्रस्तावाबाबत कोणता निर्णय घेण्यात आला, त्यानुसार त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कांजूर, भांडूप, नाहूर, मुलुंड व वडाळा या भागात खार जमिनी (Salt Pan Land) असून त्यांचे अंदाजित क्षेत्रफळ २५६ हेक्टर आहे. सदर जमिनी या केंद्र शासनाच्या अखत्यारित आहेत. बृहन्मुंबईतील केंद्र शासनाच्या मालकीच्या मिठागराच्या जमिनी झोपडपट्टी पुनर्वसनासाठी व परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीसाठी उपयोगात आणण्याकरिता राज्य शासनाकडे वर्ग करण्यासंदर्भात केंद्र शासनास मा.मुख्यमंत्री महोदय यांचेस्तरावरुन दिनांक ३० डिसेंबर, २०१४ पासून पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

तसेच, महसूल व वन विभागाच्या दिनांक २४/७/२०१५ च्या शासन निर्णयानुसार बृहन्मुंबईतील मिठागर जमिनीच्या विनियोजनासंबधी केंद्र व राज्य शासन यांच्यामधील विचारविनियमाच्या प्रक्रियेमध्ये समन्वय विषयक भूमिका बजावण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांना समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच बृहन्मुंबईतील मिठागर जमिनीचा समुचित वापर करण्याच्या दृष्टीने विकास नियोजनाच्या प्रयोजनार्थ अशा जमिनीचा बृहत आराखडा नगर विकास विभाग, पर्यावरण विभाग, गृहनिर्माण विभाग तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहभागाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) तयार करण्यासाठी व बृहत आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेवर पर्यवेक्षण व संनियंत्रण ठेवण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली महसूल व वन विभागाच्या दिनांक २१/८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समिती गठित करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------------

## पुणे शहरात रिंग रोड उभारण्याबाबत

**(९) * २७४८९ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक २०९१० ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात रिंग रोड निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे शहराच्या हद्दीबाहेर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (PMRDA) हद्दीत रिंग रोड निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) व (३) पीएमआरडीए हद्दीत मंजूर प्रादेशिक योजनेतील ९० मी. रस्त्याची आखणी ११० मी. करणेबाबत संबंधित प्राधिकरणाने सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २० अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन मान्यता दिलेली असून याबाबतची अधिसूचना दिनांक १७/०३/२०१७ रोजी निर्गमित केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील गैबीनगर परिसरात अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याबाबत

**(१०) * २८२५२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील गैबीनगर परिसरात अज्ञात व्यक्तीने एका साडेसहा वर्षीय मुलीचे अपहरण करुन तिच्यावर बलात्कार केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात अपहरण आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अत्याचारग्रस्त मुलीवर वेळीच उपचार झाले नसल्याने पोलीस व रुग्णालयाच्या वागणुकीबाबत पिडीत मुलींच्या पालकांनी व नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पिडीत मुलीला न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

पिडीत मुलीस तिचे नातेवाईक व पोलिसांचे मदतीने प्रथम भिंवडी येथील रुग्णालयात व तद्नंतर सिव्हील हॉस्पिटल, ठाणे व जे.जे.हॉस्पिटल, मुंबई येथे पाठविण्यात आले.

(४) सदर अज्ञात आरोपीविरुध्द शांतीनगर पोलीस ठाणे भिवंडी येथे गुन्हा रजि.नं.I ३४९/२०१६ भादंवि कलम ३६३, ३७६, ३७७, ३४२ सह पोक्सो कलम ४, ५, ७, ८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे. अज्ञात आरोपीचा तपास करण्यात येत आहे. पिडीतास मनोधैर्य योजनेंतर्गत अर्थ सहाय मिळणेकरिता पोलीस स्टेशनच्या दिनांक ३१/१२/२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयास अहवाल सादर केला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोडबंदर रोड (जि.ठाणे) येथील एका हॉटेलच्या परिसरात डिप्लेटेड युरेनियम जप्त केल्याबाबत

**(११) * २६७२८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील घोडबंदर रोडवरील एका हॉटेलच्या परिसरात दोघांकडून रुपये २४ कोटी किंमतीचे ८ किलो ८६१ ग्रॅम वजनाचे डिप्लेटेड युरेनियम दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास ठाणे पोलिसांनी जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू युरेनियम हे इंडियन एअरलाईन्सने भंगारात काढलेल्या एका विमानातून मिळाले होते अशी माहिती अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी २ आरोपींना अटक करून त्यांचेविरुध्द कासारवडवली पो.स्टे. येथे गुरनं. १११/२०१६, ॲटोमिक एनर्जी ॲक्ट सन १९६२ चे कलम २४(१)(अ)(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणामध्ये मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नालासोपारा (प), राजोडी येथील हरितपट्टयात अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(१२) * २९८७३ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा (प), राजोडी येथील सर्व्हे नं.४६, हिस्सा क्रं.७ या हरितपट्टयात वसई-विरार महानगरपालिकेच्या प्रभारी सहायक आयुक्त यांचे पती आणि अन्य एक व्यक्ती यांनी बोगस व खोटी विकास परवानगी व दस्तऐवज तयार करुन बेकायदेशीर बांधकाम केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका प्रभाग समिती (अ) च्या सहायक आयुक्तानी नालासोपारा पोलीस ठाण्यात दिनांक २१ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंदवूनही मुख्य आरोपीना संरक्षण देत असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, नालासोपारा (प.) राजोडी येथील सर्व्हे नं. ४६, हिस्सा क्र. ७ या जागेवर बनावट कागदपत्राच्या आधारे अनधिकृत बांधकाम केल्यामुळे वसई-विरार शहर महानगरपालिकने दाखल केलेल्या प्रथम खबरी अहवालाच्या अनुषंगाने श्री.प्रशांत नारायण चौधरी व श्री.जोसेफ अगस्तीन तुस्कानो यांचेविरुध्द नालासोपारा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१४१/२०१६ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह म.प्रा.न.अधि. ५३, ५४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

श्री.जोसेफ अगस्तीन तुस्कानो हे श्रीमती तुस्कानो, प्रभारी सहाय्यक आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे पती आहे. ही वस्तुस्थिती आहे.

(२) नाही. नालासोपारा (प.) पोलीस ठाणे येथे श्री.प्रशांत चौधरी व श्री.जोसेफ तुस्कानो यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला असून त्यांना याप्रकरणी अटक करण्यात आली होती.

त्यांना न्यायालयाने जामीन मंजुर केला आहे.

(३) व (४) याप्रकरणी पोलीस स्टेशन, नालासोपारा (प.) येथे गुन्हा दाखल असून पोलीस अधिक तपास करीत आहे.

-----------------

## नवी मुंबईतील हिरानंदानी रुग्णालयाने बळकावलेल्या भूखंडावरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(१३) * २९१९९ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील हिरानंदानी रुग्णालयाने बळकावलेल्या भूखंडावरील अतिक्रमण तीन महिन्यात हटवावे असे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने रुग्णालय व्यवस्थापनाला दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालय व्यवस्थापनाने संबंधित बांधकामे हटवली नाहीत तर सिडकोने तरी हटवावीत असेही मा.न्यायालयाने स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्णय घेवून सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे,

रिट याचिका क्र. १३१५९/२०१६ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०६/०१/२०१७ च्या आदेशाद्वारे पुढीलप्रमाणे निर्देश दिले :-

सदर रुग्णालयाच्या बाजूस असलेल्या मोकळ्या भुखंडावरील अतिक्रमण मे.हिरानंदानी हेल्थ केअर प्रा.लि. यांनी ३ महिन्यांच्या आत हटवून उक्त जागा सिडकोच्या ताब्यात द्यावी. जर मे.हिरानंदानी हेल्थ केअर प्रा.लि. यांनी विहित मुदतीत अतिक्रमण हटविले नाही, तर शहर व औद्योगिक विकास महामंडळाने कोणतीही नोटीस न देता सदर अतिक्रमण हटवून जागा ताब्यात घ्यावी.

(३) मे.हिरानंदानी हेल्थ केअर प्रा.लि. आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग झाल्याने हा करारनामा रद्द करण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेने दिनांक १८/०१/२०१७ रोजी आदेश पारित केले होते. सदर आदेशाविरोधात, तसेच मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१३१५९/२०१६ प्रकरणी दिनांक ०६/०१/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाविरोधात मे.हिरानंदानी हेल्थ केअर प्रा.लि. यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका व स्पेशल लिव्ह टू अपिल दाखल केले आहे.

या अनुषंगाने दिनांक २७/०२/२०१७ रोजीच्या सुनावणीदरम्यान मा.सर्वोच्च न्यायालयाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १८/०१/२०१७ च्या आदेशास, तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ०६/०१/२०१७ च्या आदेशास दिनांक २७/०३/२०१७ पर्यंत स्थगिती दिली असल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लातूर शहरास पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(१४) * ३०२०३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २२६६४ ला दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी उजनी जलाशयातून नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याबाबत केंद्र शासन अमृत योजनेंतर्गत लातूर महानगरपालिकेच्या मागणीनुसार वितरण व्यवस्थेची सुधारणा करणे कामी रुपये ४६.२१ कोटी किंमतीच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उजनी जलाशयातून लातूर शहरास पाणीपुरवठा करण्याच्यादृष्टीने लातूर महानगरपालिकेने पाणी आरक्षण मिळवणे व सदर योजना राबविण्यास महानगरपालिकेने ठराव करणे आवश्यक असल्याने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत लातूर महानगरपालिकेच्या मागणीनुसार वितरण व्यवस्थेची सुधारणा करणे कामी रुपये ४६.२० कोटी किंमतीच्या प्रकल्पास शासनाने मान्यता दिलेली आहे.

तथापि, उजनी जलाशयातून लातूर शहरास पाणीपुरवठा करण्याच्या योजनेबाबत लातूर महानगरपालिकेने पाणी आरक्षण मिळवणे व सदर योजना राबविण्यास महानगरपालिकेचा ठराव करणे आवश्यक आहे.

लातूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी उजनी किंवा माजलगांव या दोन्ही पर्यायाची व्यवहार्यता पडताळून पाहण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आले आहे.

-----------------

**कोपरी (जि.ठाणे) येथील उड्डाणपुलाचे बांधकाम सुरु करणेबाबत**

**(१५) * २७५७२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक १९९८५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरी (जि.ठाणे) येथील उड्डाणपुलाचे काम सुमारे १२ ते १३ वर्षांपासून प्रलंबित असून ठाणेकरांना या कोपरी उड्डाणपुलाच्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.एम.आर.डी.ए. च्यावतीने या उड्डाणपुलाच्या कामासाठी रुपये २५९ कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) व (४) सदर पुलाचे सविस्तर आराखडे बनवून त्यास रेल्वेची मंजुरी घेण्याची प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

-----------------

## मुंबई शहरातील जलप्रवासी वाहतूकीबाबत

**(१६) * ३००८५ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील प्रचंड वाहतूक समस्येवर उपाययोजना करण्यासाठी शासनाने बोरीवली ते नरिमन पॉईंटपर्यंत सागरी वाहतूकीकरिता वॉटर टर्मिनस कॉर्पोरेशनची स्थापना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सागरी महामार्गाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच या महामार्गास किती खर्च येणार आहे व हा प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत बंदर विकास जलप्रवासी वाहतूक व जलपर्यटन ही कामे करण्यात येतात, त्यापैकी जलप्रवासी वाहतुकीसाठी वॉटर ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनची स्थापना करणे प्रस्तावित असून ह्यासंदर्भात सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(२) शासन निर्णय गृह विभाग दिनांक ३०/०६/२०१५ अन्वये, मुंबईच्या पूर्व पश्चिम किनारपट्टीवरील जलवाहतूक प्रकल्पांच्या अंमलबजावणीची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे सोपविलेली आहे. सदयस्थितीत, बांद्रा ते वर्सोवा, वरळी ते हाजी अली सी लिंक, नरिमन पॉईंट ते कांदिवली कोस्टल रोड व भुयारी रेल्वे हे प्रकल्प प्रस्तावित असल्यामुळे बांद्रा, जुहू, वर्सोवा मार्वे ही ठिकाणे सध्या वगळून नरिमन पॉईंट ते बोरीवली जलप्रवासी वाहतूकीबाबत सुसाध्यता व प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोसरी (जि.पुणे) एमआयडीसीतील जमीन खरेदी प्रकरणाबाबत

**(१७) * २७३११ श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २४५२५ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसरी (जि.पुणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची सुमारे तीन एकर जमीन खरेदी करण्यात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी माजी महसूल मंत्री यांची चौकशी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश ए.आर.जोशी यांच्या अध्यक्षतेखालील न्यायालयीन चौकशी अद्यापही पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व यासाठी अजून किती कालावधी लागणार आहे,

(३) तसेच, याप्रकरणी न्यायालयीन चौकशी समितीच्या अहवालावर अवलंबून न राहता आधी शासनाने तक्रारीवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी अशा आशयाचे आदेश मा.उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळी दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने शासनास दिलेल्या आदेशाचे स्वरुप काय आहे, यावर शासनाचे मत काय आहे व याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश ए.आर.जोशी यांचे अध्यक्षतेखाली नियुक्ती केली नाही. परंतु, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकःएमआयएन-१२१६/प्र.क्र..१८८/२१, दिनांक २३/०६/२०१६ नुसार तत्कालीन मा.मंत्री, महसूल यांच्या औद्योगिक विकास महामंडळाच्या भोसरी, जि.पुणे येथील जमीन खरेदी गैरव्यवहारातील सहभागाबद्दल न्यायालयीन चौकशी करण्याकरिता मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमुर्ती डी.एस.झोटींग यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर चौकशीसाठी न्या.झोटींग (निवृत्त) यांच्या एक सदस्यीय समितीने विनंती केल्यानुसार त्यांना चौकशी करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून समितीचा अहवाल प्रलंबित आहे.

(३) व (४) मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या क्रिमिनल रिट याचिका क्र. २५३९/२०१६ यामध्ये सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत स्वतंत्रपणे चौकशी करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०३/२०१७ रोजी निर्देश दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील घरेलू कामगारांसाठी पेन्शन योजना सुरु करण्याबाबत

**(१८) * २७३८६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे १५ लाख घरेलू कामगार असून त्यामध्ये वृध्द महिला कामगारांची संख्या मोठया प्रमाणात असल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर वयाच्या ६० व्या वर्षानंतर राज्यातील घरेलू महिला कामगारांना पेन्शन योजना सुरु करण्यात यावी अशी शासनाकडे मागणी नॅशनल डेमोट्रीक वर्कस वेल्फेअर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी केली असून त्यासाठी आझाद मैदान, मुंबई येथे अनेकदा धरणे आंदोलन करुन वेळोवेळी शासनाचे लक्ष वेधले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरेलु कामगारांच्यावतीने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान हिवाळी अधिवेशन, नागपूर येथे काढलेल्या मोर्चाच्यावेळी "घरेलू कामगारांसाठी पेन्शन योजना चालू करण्यात येईल" असे तत्कालिन मा.कामगार मंत्री यांनी मोर्चेकऱ्यांना आश्वासन देऊनही त्याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने आश्वासन देऊनही घरेलू कामगारांसाठी पेन्शन योजना लागू न करण्याची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.
(२) अंशतः खरे आहे. महाराष्ट्र राज्य घर कामगार युनियन व राष्ट्रीय घरेलू कामगार वेलफेअर ट्रस्ट यांनी त्यांच्या घरेलू कामगारांच्या विविध मागण्यांबाबत दिनांक १/१०/२०१६ रोजी आझाद मैदान येथे मोर्चा काढून निवेदन दिले.
(३) हे खरे नाही, असे आश्वासन विधानमंडळात देण्यात आलेले नाही.
(४) केंद्र शासनाव्दारे राबविण्यात येणाऱ्या "अटल पेन्शन योजनेचा" लाभ घरेलू कामगार घेऊ शकतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे शहरातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत**

**(१९) * २९८००  श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील मुंब्रा, दिवा, वागळे, किसन नगर, लोकमान्यनगर या भागात अनधिकृत बांधकामे झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१५ पूर्वी बांधलेली कामे मा.मुख्यमंत्री महोदयांनी उल्हासनगरच्या धर्तीवर काही अटी व शर्तींची पूर्तता करून नियमित करण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनधिकृत बांधकामांची संख्या १ लाख २३ हजार असून यासंदर्भात शासनाने कोणत्या अटी व शर्ती पूर्ण केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नागरी क्षेत्रासाठी अनधिकृत बांधकामे नियमित करणे, त्यावर कारवाई करणे, तसेच याबाबत उपाययोजना सूचविण्यासाठी आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे. सदर अहवाल शासनाने स्विकारला आहे.

त्यानुषंगाने अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करणे, अनधिकृत बांधकामे होऊ नये यासाठी प्रशासकीय तसेच कायद्यामध्ये सुधारणा प्रस्तावित करणे, झालेली अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्यासाठी धोरण ठरविणे, आरक्षणामध्ये असलेले बांधकामे नियमानुकूल करणे इ. साठीचे शासनाने सुधारीत धोरण ठरवून त्यास दिनांक २८/०७/२०१६ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झालेली आहे.

मा.मंत्रीमंडळाने मान्य केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञपत्र दिनांक ३१/०७/२०१६ रोजी दाखल करुन त्यास मा.उच्च न्यायालयाची अनुमती अपेक्षिलेली आहे. मा.उच्च न्यायालयामध्ये निर्णय प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातून वाहणारी नागनदी प्रदुषण मुक्त करणेबाबत

**(२०) * २६८६९ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातून वाहणाऱ्या नागनदीच्या प्रदूषित पाण्याची झळ गोसीखुर्द धरणापर्यंत पोहोचली असून प्रदुषण कमी करण्यासाठी विविध ठिकाणी मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याचा प्रस्ताव नागपूर सुधार प्रन्यासतर्फे हाती घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जनहित याचिका क्र. ३८/१०१० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार नागपूर शहरातून वाहणा-या नागनदीच्या पाण्याचे प्रदुषण कमी करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासतर्फे नागपूर शहरात विविध १० ठिकाणी ६५.३ एम.एल.डी. क्षमतेचे व रुपये १३०.८३ कोटी अपेक्षित किंमतीचे मलजल प्रक्रिया केंद्र व २ पंम्पींग स्टेशन उभारण्याचा प्रस्ताव हाती घेण्यात आला आहे.

(२), (३) व (४) या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यासद्वारे निविदा प्रक्रिया राबवून, संबंधित पात्र कंत्राटदारास दिनांक ०४/०१/२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. सदरचे काम पूर्ण करण्यास १८ महिन्याचा कालावधी देण्यात आलेला आहे.

निविदेतील अटीनुसार संबंधित कंत्राटदारांनी मलजल प्रक्रिया केंद्राचे डिझाईन विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर यांचेकडे मंजूरीसाठी सादर केले आहे.

-----------------

**कळंबोली शहरातील नालेसफाईच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२१) * ३०५८५ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिकेंतर्गत कळंबोली शहरातील नालेसफाईची कामे न करता ठेकेदारांनी ४८ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम घेतल्याची बाब शासनाच्या माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही. तथापि, सन २०१६ मध्ये नालेसफाईसाठी सिडकोने विहित कार्यपध्दती अनुसरुन ६९ स्थानिक प्रकल्पग्रस्त ठेकेदारांमार्फत सदर कामे केली आहेत. पावसाळी कामांवर देखरेख, नियंत्रण व समन्वय साधण्यासाठी मे.मिटकॉन कन्स्ल्टंसी आणि इंजिनियरींग सर्व्हिसेस लि. या संस्थेची नेमणूक करण्यात आली होती. सदर संस्थेच्या अहवालानुसार सन २०१६ मध्ये कळंबोली विभागातील नालेसफाईची सर्व कामे पूर्ण झालेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील पोलीस उपनिरीक्षक यांच्या गैरवर्तणुकीबाबत**

**(२२) * २६७५५ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक, डॉ.वाघ यांच्या गैरवर्तणुकीबाबत कारवाई करण्यात यावी यासाठी मालवण पोलीस ठाणे येथे बेमुदत उपोषणाच्या इशारा स्थानिकांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सतीश आचरेकर रा.वायरी भुतनाथ याने मोहीत मिलींद झाड यांना केलेल्या मारहाणीबाबत मालवण पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ०२/२०१७ भादंवि कलम ३०७, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे सदर गुन्हयातील आरोपीतास अटक करावी व राजन चव्हाण यांना पोलीस उपनिरीक्षक एस.आर.वाघ मालवण पोलीस ठाणे यांचेकडून चांगली वागणूक मिळाली नाही याबाबत त्यांची तक्रार पोलीस ठाण्यात घेण्यात आलेली नाही या कारणावरून वायरी येथील ग्रामस्थांनी दिनांक ०२/०१/२०१७ रोजी विनापरवाना, वायरी येथे रास्तारोको आंदोलन केले होते. सदरचे आंदोलकांविरूध्द मालवण पोलीस ठाणे गुन्हा. रजि.नं. ०३/२०१७ भादंवि कलम १८८ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)/१३५ प्रमाणे दिनांक ०२/०१/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा मागे घेण्याबाबत ग्रामस्थ वायरी भुतनाथ ता.मालवण यांनी दिनांक १०/०१/२०१७ रोजी बेमुदत उपोषण करणार असल्याचे निवेदन दिले होते.

सदर घटनेची चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी कणकवली यांनी केली असून सदर चौकशीत मालवण पोलीस ठाणे येथील गु.र.नं. ०२/२०१७ मधील दोन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच पोलीस उपनिरीक्षक श्री.एस.आर.वाघ मालवण पोलीस ठाणे यांनी मालवण पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आलेल्या तक्रारदाराशी कोणतीही गैरवर्तणुक केली नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) पोलीस स्थानकातील तीन पोलिसांना दरोडयाच्या गुन्हयांमध्ये अटक करण्यात आल्याबाबत**

**(२३) * २८५३४ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथे अपहरण, खंडणी आणि दरोड्याच्या गुन्हयांमध्ये अलिबाग पोलीस स्थानकातील तीन पोलिसांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार दरोडयात दोषी आढळून आलेल्या पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अलिबाग (जि.रायगड) येथे अपहरण, खंडणी आणि दरोड्याच्या गुन्हयामध्ये पोलीस मुख्यालय, अलिबाग नेमणूकीतील ४ पोलिसांना अटक करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी दहा आरोपींविरूध्द अलिबाग पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ०२/२०१७ भादंविसं कलम ३९५, ३६४(अ), १२०(ब), १६६, ४१२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून ९ आरोपींना अटक केलेली आहे. गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी शहरात प्रधानमंत्री आवास योजना राबविण्याबाबत**

**(२४) * २९३८८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहर महानगरपालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या व स्वत:चे घर नसलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घर उपलब्ध करून देण्यासाठी १४ हजाराहून अधिक लाभार्थ्यांची यादी महानगरपालिकेच्यावतीने जारी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व लाभार्थ्यांना घरे देण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२) व (३) मा.पंतप्रधान, भारत सरकार यांनी जून, २०१५ मध्ये 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची घोषणा केली आहे. या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मंत्रिपरिषदेच्या मान्यतेने दिनांक ९/१२/२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार ५१ शहराचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये परभणी शहराचा समावेश करण्यात आला आहे. केंद्र शासनाने नव्याने ९१ शहरांचा समावेश करण्याचे कळविले आहे. त्यानुसार सदर योजना राज्यात १४२ शहरात राबविण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयानुसार मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांना सुकाणू अभिकरण (Nodal agency) नियुक्त केले आहे. सदर योजनेची माहिती जनसामान्य व्हावी या उद्देशाने प्रसिध्दी व फलक लावण्यात आले आहेत. तसेच संपूर्ण शहरामध्ये लाऊडस्पीकरव्दारे प्रसिध्दी करण्यात येऊन लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच शहरातील झोपडपट्टी भागात नागरीकांना या योजनेची सखोल माहितीकरिता मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करून तसेच घरोघरी जाऊन मार्गदर्शक सूची व तपासाची सूची वाटप करुन अजून अर्ज भरुन घेण्यात आले आहेत. परभणी शहरात मागणी सर्वेक्षणांतर्गत आतापर्यंत एकूण १५२३२ अर्ज प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेल्या संपूर्ण अर्जांची प्राथमिक यादी आक्षेप/हरकती व नाव दुरुस्तीकरिता परभणी मनपाच्या ३

प्रभाग समिती कार्यालयामध्ये प्रसिध्दी करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये घटक क्र. ४ आर्थिकदुर्बल घटकातील लाभार्थ्यांव्दारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान या अंतर्गत स्वत:च्या मालकीच्या जागा असलेल्या एकूण ३४५९ लाभार्थ्यांचा प्रस्ताव सुकाणू अभिकरण (Nodal agency) म्हणून म्हाडास पाठविण्यात येत आहे. तसेच प्राप्त अर्जांची पडताळणी करुन शासनाच्या MIS संकेतस्थळावरुन नोंदणीचे काम सुरु करण्यात आले आहे.

-----------------

**ज्योतिबाची वाडी (ता.कर्जत) येथील अल्पवयीन मुलीच्या अपहरणाबाबत**

**(२५) * २७८०१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्योतिबाची वाडी (ता.कर्जत) येथील अल्पवयीन मुलीस दोन महिन्यापुर्वी अपहरण केल्यानंतर २६ दिवसानंतर तिची सुटका केल्यानंतर गुन्हेगार कोकणगांव येथील दत्तात्रय लक्ष्मण सातपुते याला जामिन मिळाल्यानंतर पुन्हा तिचे अपहरण केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिडीत मुलीच्या आईने येसवाडी येथील अवैध दारुचे दुकानातील मुलगा आणि मित्र छेडछाड करतात अशी तक्रार कर्जत पोलीस ठाण्यात देऊनही पोलिसांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर बाबत कर्जत पोलीस स्टेशनला तक्रारी अर्ज प्राप्त असून त्यात प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) सदर प्रकरणी कर्जत पोलीस स्टेशन गु.र.नं.१८/२०१७ भादंवि कलम ३६३, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन आरोपी असून, ते अद्याप मिळुन आलेले नाही. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे. सीआरपीसी १०७ प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही व सीआरपीसी १४९ प्रमाणे नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालाड (पूर्व) येथील राणी सती मार्गावरील मुंबई महानगरपालिकेच्या मनोरंजन मैदानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) * २८३२१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पूर्व), येथील राणी सती मार्गावरील मुंबई महापालिकेच्या मनोरंजन मैदानाची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १० वर्षापासून सदर मैदानाच्या देखभालीकडे महानगरपालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष झाल्याने रात्रीच्या वेळी येथे सर्रास दारुच्या पार्ट्या होत असून त्यातच मागील ७ ते ८ महिन्यांपूर्वी एका युवकाने आत्महत्या केली आहे, या सर्व प्रकारामुळे नागरिकांना नाहक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मालाड (पूर्व), मुंबई येथील राणी सती मार्गावरील बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मनोरंजन मैदान विकसित करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(२) माहे एप्रिल, २०१६ टिप्को मैदान, मालाड (पूर्व) येथे आजारास कंटाळून ४५ वर्षीय गृहस्थाने आत्महत्या केली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर मैदानाचे नियमित परिरक्षण करण्यात येत असून याठिकाणी आता सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## क्युनेट कंपनीच्या माध्यमाने नागरिकांची फसवणूक केल्याबाबत

**(२७) * २६९०७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "क्युनेट" या वेबसाईटच्या माध्यमातून सदस्य जोडा आणि पैसे कमवा या मल्टीपल मार्केटिंगच्या आमिषाने देशभरातील सुमारे २०० जणांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथील १० जणांची ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वेबसाईटवर व्यवसाय करण्यासाठी सुवर्णसंधीच्या जाहिरातून आमिष दाखवून कोट्यवधीची फसवणूक करणा-या वेबसाईटवर बंदी आणण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त फसवणूक प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) क्युनेट ही आंतरराष्ट्रीय कंपनी मल्टीलेवल मार्केटींगचा व्यवसाय करीत असून सदर कपंनीची फ्रेन्चाइजी विहान डायरेक्ट सेलींग इंडिया प्रा.लि., या कंपनीने ऑनलाईन वस्तु विक्रीचा व्यवसाय करीत असल्याचे दर्शवून, पुण्यातील ४५ गुंतवणूकदारांची रुपये १,८०,००,०००/- ची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) व (४) गुन्हा करण्यासाठी qnetindia.net व portal.qnetindia.net या वेबसाईटचा वापर करण्यात आला. या वेबसाईटची माहिती मिळण्यासाठी Nodel Officer, Net4.in यांचेकडून माहिती मागविण्यात आली असून, सदर माहिती प्राप्त होताच ही वेबसाईट बंद करण्याबाबत पुढील कार्यवाही केली जाईल.

विहान डायरेक्ट सेलींग इंडिया प्रा.लि. या कंपनीचे बंगलोर येथे कार्यालय असून, तेथे १४ बँकांमध्ये कंपनीची खाती आहेत. सदर खाती गोठविण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौ.फादरवाडी (ता.वसई, जि.पालघर) येथील अल्पवयीन तरुणीवर अत्याचार केल्याबाबत**

**(२८) * ३००१६ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.फादरवाडी (ता.वसई, जि.पालघर) येथील एका आदिवासी अल्पवयीन तरूणीला लग्नाचे आमिष दाखवून तिची अश्लिल चित्रफीत तयार करुन तिच्यावर गेल्या तीन वर्षापासून सामूहिक बलात्कार केल्याप्रकरणी पिडीत तरुणीने माणिकपूर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पोलिसांनी किती जणांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी माणिकपूर पोलीस ठाणे येथे गुरनं. I ३८/२०१७ भादंवि कलम ३६३, ३७६, ३७६(ड) सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८, १२, आय टी ॲक्ट कलम ६६ ई प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील एकुण ६ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत बाल लैंगिक शोषणात झालेली वाढ

**(२९) * ३०२३७ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गत तीन वर्षांच्या तुलनेत सन २०१५-२०१६ या वर्षात बाल लैंगिक शोषणात वाढ झाल्याचे पोलिसांच्या आकडेवारीनुसार माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाल लैंगिक शोषणात वाढ होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०१२ ते २०१४ या तीन वर्षात ७३७ गुन्हे दाखल असून, सन २०१५ व २०१६ मध्ये ९०२ गुन्हे दाखल आहेत.

(२) बाल लैंगिक शोषणावर बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत :-

- पोलीस दीदी योजनेमार्फत शाळा व परिसरातील मुलांना अनोळखी व्यक्तींबाबत दक्षता घेण्याचे मार्गदर्शन करतात.
- शाळामध्ये विद्यार्थ्यांना बॅड टच व गुड टच बाबत मार्गदर्शन केले जाते.
- मोहल्ला कमिटीतील पोलीस मित्र सभासद यांचे बैठका घेऊन मुलांना बाहेर सोडू नये, अनोळखी, संशयीत वाटल्यास पोलीसांना खबर देणे असे सूचना देण्यात येतात.

- पोलीस ठाणे हद्दीत बिनतारी संदेश वाहन, बीट अधिकारी यांचेमार्फत गस्त घालण्यात येते.
- महिला कक्षाची स्थापना केली आहे.
- महिला दक्षता कमिटीची स्थापना करण्यात आली आहे.
- महिला छेडछाड विरोधी पथके तयार करण्यात आली आहे.
- ९४ महिला व बाल सुरक्षा गस्त पथके तयार करण्यात आली आहेत.
- १०२ महिला बीट मार्शल मोटार सायकल वाहनासह नेमण्यात आले ओहत.
- विशेष हेल्पलाईन १००, १०३ व १०९० सुरु करण्यात आली आहेत.
- पोस्को कायदाप्रमाणे कठोर कारवाई करण्यात येते.
- निर्मनुष्य जागेच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, प्रकाश व्यवस्था करण्याचे उपाययोजना राबविण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कचरा वाहून नेण्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३०) * २७५२० श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सन २०१२ ते २०१६ या कालावधीत कचरा वाहून नेण्याच्या कामात सुमारे ९०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जून, २०१२ ते मे, २०१७ या कालावधीसाठी कचरा वाहून नेण्यासाठी देण्यात आलेल्या कंत्राटात भ्रष्टाचार झाल्याबाबत दिनांक २६/१०/२०१६ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात येत आहे. चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील सात महानगरपालिकाकरिता स्वतंत्र परिवहन यंत्रणा स्थापन करण्याबाबत**

**(३१) * २७५३५ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४९७६ ला दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सात महानगरपालिकांची परिवहन सेवा सुखकर होण्याच्यादृष्टीने महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमांतर्गत सुसुत्रता व यथायोग्य नियोजन व नियंत्रण राहण्यासाठी एकच स्वतंत्र यंत्रणा वा प्राधिकरण स्थापन करण्यात यावे अशी आग्रही मागणी शासनाकडे गेल्या ५ वर्षापासून ते आजतागायत करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन अधिसूचना दिनांक २५ फेब्रुवारी, २००८ नुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मुंबई व ठाणे यांचे विलिनीकरण मुंबई महानगर क्षेत्राकरिता प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मुंबई महानगर क्षेत्राचे गठन करण्यात आले आहे, तसेच सदर महानगर क्षेत्र प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिकेच्या परिवहन सेवा सुधारणेबाबत गेल्या ५ वर्षात एकदाही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणेकर जनता, प्रवासी संघटना व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याबाबत माहे डिसेंबर, २०१६ व माहे जानेवारी, २०१७ मध्ये मा.पंतप्रधान तसेच मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून कार्यवाहीची मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाऐवजी ठाणे जिल्ह्यातील सात महानगरपालिकाच्या परिवहन सेवावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र परिवहन यंत्रणा स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.
(४) व (५) मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाकडून ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिकांच्या परिवहन सेवांवर नियंत्रण ठेवणे अपेक्षित आहे.

-----------------

**कोल्हापूर येथे पोलीस उपनिरीक्षक पदासाठी खात्यांतर्गत परीक्षेस बसलेल्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्याबाबत**

**(३२) * ३०२७१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस महासंचालक कार्यालयाच्या परिपत्रकानुसार सन २०१३ मध्ये कोल्हापूर येथे पोलीस उपनिरीक्षक पदासाठी परीक्षा घेण्यात आली असून सदर परीक्षा पोलीस दलात १० वर्षे काम करणाऱ्या २५ हजार ६६७ कर्मचाऱ्यांनी दिली असून या परीक्षेत १९ हजार ५० कर्मचारी उत्तीर्ण झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या केवळ १ हजार ९०० कर्मचाऱ्यांची उपनिरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आल्यानंतर इतरांना नियुक्ती न दिल्यामुळे त्यांनी न्यायालयामार्फत दाद मागितली असता न्यायालयाने सर्व युक्तीवाद ऐकल्यानंतर खात्यात दाखल झालेली तारीख हीच सेवाजेष्ठता गृहीत धरून उत्तीर्ण झालेल्या पोलिसांना उपनिरीक्षक म्हणून बढती देण्याचा आदेश दिला असतानाही आजमितीस सदरहू आदेशाची पोलीस प्रशासनाकडून अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायालयाने दिलेल्या आदेशाची विनाविलंब अंमलबजावणी होऊन सन २०१३ मध्ये उत्तीर्ण झालेल्या खात्यांतर्गत कर्मचाऱ्यांना त्यांच्या पोलीस खात्यातील नियुक्तीची तारीख जेष्ठतेसाठी गृहीत धरून फौजदारपदी नियुक्ती देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, तथापि एकूण २८,११४ कर्मचाऱ्यांनी सदर परीक्षा दिली असून त्यापैकी १९,३८४ कर्मचारी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

(२), (३) व (४) विभागीय अर्हता परीक्षा २०१३ मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी ते खात्यात दाखल झालेला दिनांक हीच सेवाजेष्ठता गृहीत धरुन पदोन्नतीच्या रिक्त पदावर, माहे ऑक्टोंबर, २०१३ ते जुलै, २०१४ पर्यंत एकूण १९०७ पोलीस कर्मचाऱ्यांना टप्याटप्प्याने तात्पुरती अभावित पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. तसेच माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत रिक्त असलेल्या पदावर विभागीय अर्हता परीक्षा २०१३ मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी भरतीच्या दिनांकाला सेवाज्येष्ठ असलेल्या पात्र उमेदवारांना त्यांची पात्र-पात्रता तपासून तात्पुरती अभावित पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबईतील ऐतिहासिक वास्तूंच्या जीर्णोध्दाराच्या कामांच्या निकषामध्ये सवलत देण्याबाबत

**(३३) * २८०२० श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शहरातील वारसा वास्तूंचे काळजीपूर्वक संरक्षण आणि देखभाल (परिक्षण) करण्याच्या दृष्टीने विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ६७ मध्ये सुधारणा करुन वारसा वास्तु जतन अधिनियम अधिनियमित केल्याने मुंबईतील ऐतिहासिक वास्तुंचे जीर्णोध्दार प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील ऐतिहासिक वास्तुंच्या जीर्णोध्दाराच्या कामांच्या निकषामध्ये सवलत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशी बाब नाही.

पुरातन वास्तूंच्या जतनासंदर्भाने बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ६७ मध्ये असलेल्या तरतूदीमध्ये शासनाने जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान सुधारणा केलेल्या नाहीत.

उक्त विनियम ६७(३) चे तरतूदीनुसार पुरातन वास्तूंच्या यादीस शासनाने मान्यता देणेची तरतूद आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने विनियम ६७ च्या तरतूदीनुसार कार्यवाही पूर्ण करुन सादर केलेल्या एम, डी, एफ/उत्तर, एफ/दक्षिण, जी/उत्तर, जी/दक्षिण या प्रभागांच्या सुधारित पुरातन वास्तूंच्या यादीस शासनाकडून मंजूरी देणेत आलेली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई-विरार महानगरपालिका परिवहन सेवेतील कामगारांच्या किमान वेतनात वाढ करण्याबाबत**

**(३४) * ३००९६ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या “सार्वजनिक मोटर वाहतूक संबंधातील कामधंदा” या निकषानुसार किमान वेतन दिले जात आहे ते महानगरपालिकेच्या किमान वेतनाच्या तुलनेत कमी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय करून त्यांचे किमान वेतन राज्य शासनाच्या “सार्वजनिक मोटर वाहतूक संबंधातील कामधंदा” या निकषानुसार दिले जाणारे किमान वेतन कमी असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या इतर कर्मचा-यांना दिल्या जाणा-या वेतनानुसार किमान वेतनात वाढ करण्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.परिवहन मंत्री, मा.कामगार राज्यमंत्री, कामगार आयुक्त तसेच सचिव, कामगार विभाग यांच्याकडे दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास वसईचे माजी लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेच्या परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांना किमान वेतनाचे निकष लागू करून महापालिकेच्या इतर कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या वेतनानुसार किमान वेतन देण्याबाबत शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील अनुसूचित रोजगारातील कामगारांना किमान वेतन दराची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक २२/०१/२०१६ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

उक्त परिपत्रकाचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**राज्यात गुन्हे तपासाची प्रक्रिया जलदगतीने करण्याबाबत**

**(३५) * २६९०९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या १५ वर्षात विविध प्रकारच्या फौजदारी स्वरुपाचे एकूण ५२ लाख १५ हजार ४८९ गुन्हे पोलीस ठाण्यांमध्ये नोंदविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हयांपैकी राज्यात गुन्हे शाबितीचे प्रमाण केवळ १८ टक्के असल्याचे एसीबीमार्फत दाखल होणा-या खटल्यांविरुध्द निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तपास प्रकिया जलदगतीने होण्याकरिता शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये सन २००८ ते २०१६ या कालावधीत मा.न्यायालयाने एकूण ३७५६ प्रकरणामध्ये निकाल दिलेला असून यापैकी एकूण ८६३ प्रकरणामध्ये गुन्हा शाबित झाला आहे. यानुसार लाच लुचपत प्रकरणांमध्ये दोषसिध्दीचे प्रमाण २२.९७ टक्के आहे.

(३) गुन्ह्यातील दोषसिध्दीचे प्रमाण वाढविणेबाबत शासनाचे दिनांक १२/५/२०१५ चे १४ शासन निर्णयान्वये सर्व पोलीस घटकांना सूचना देण्यात आल्या आहेत तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक २७/१०/२०१५, १८/०४/२०१६, १२/०८/२०१६ व दिनांक १/१२/२०१६ च्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त उपाययोजनांच्या परिणामस्वरुप संचालक, अभियोग संचालनालय यांच्या अहवालानुसार राज्यातील फौजदारी प्रकरणातील दोषसिध्दीच्या प्रमाणात सन २०१३-१४ मध्ये ३५.९१%, २०१४-१५ मध्ये ५१.४९%, २०१५-१६ मध्ये ५६.७७% व जानेवारी, २०१७ अखेर ५८.८७% अशी वाढ झालेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) येथील जयसागर धरणातील गाळ काढण्याबाबत**

**(३६) * ३०४४९ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) येथे सन १९६२ साली बांधण्यात आलेल्या जयसागर धरणात गाळ साचल्यामुळे पाण्याचा साठा कमी झाला असून माहे एप्रिल ते जून या कालावधीमध्ये पाणीटंचाईची शक्यता निर्माण होत असल्याने पाणी कपात करण्यात येते. त्यामुळे जव्हार शहरास दरवर्षी दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धरणातील गाळ न काढल्याने जव्हार शहरातील नागरिकांना गाळ मिश्रीत पाणी प्यावे लागत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धरणातील गाळ काढून नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गाळ साचून पाणी साठा कमी झाल्याने पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे नाही.

जयसागर धरणातून पाण्याची गळती होत असल्याने नोव्हेंबर, २०१५ ते मे, २०१६ या कालावधी करीता आठवड्यातून दोन दिवस पाणी कपात करण्यात येत होती. तथापि, माहे डिसेंबर, २०१६ अखेर धरणाची गळती थांबविण्यात आली असून आता शहरास नियमित पाणीपुरवठा करण्यात येतो.

(२) व (३) सदर धरण हे बंधारा स्वरुपातील असून आजू-बाजूच्या डोंगर उतारावरुन आलेले पावसाचे पाणी नैसर्गिकरित्या खोलगट भागात साठविले जाते. सदर भाग खडकाळ स्वरुपाचा असल्याने पाण्याबरोबर माती वाहून ती तळाशी साचल्याने गाळ निर्माण झाला आहे, अशी वस्तूस्थिती नाही.

नगरपरिषदेकडून जलशुध्दीकेंद्रात प्रक्रिया करुन पाणीपुरवठा केला जातो. पाण्याचे नमूने शासकिय प्रयोग शाळेकडून नियमितपणे तपासून घेण्यात आले असून पाणी गाळ मिश्रीत नसल्याचे तसेच ते पिण्यास योग्य असल्याचे प्रमाणित केले आहे.

भविष्यातील उपाययोजना म्हणून जयसागर धरणामधून वाहून जाणारे पुराचे पाणी अडवून नविन बंधारा बांधण्याकरीता वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून दिनांक २४/०८/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये १.६० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर कामाचे संकल्पचित्र तयार करण्याची कार्यवाही मेरी या संस्थेकडून सुरु असून पुढील आर्थिक वर्ष अखेरीस सदर काम पुर्ण होणे अपेक्षित आहे. यामुळे पाणी साठवण क्षमतेत वाढ होणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वडाळा-कासारवडवली या प्रस्तावित मेट्रो मार्ग प्रकल्पाबाबत**

**(३७) * २७६८३ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४८५६ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा-कासारवडवली या प्रस्तावित मेट्रो प्रकल्पाचे भूमिपूजन मा.पंतप्रधान यांचे हस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित वडाळा-कासारवडवली ठाणे मेट्रो याकरिता सुमारे १४ हजार ५४९ कोटी रुपये खर्चाचा या प्रकल्पाचा आराखडा असून माहे जून, २०१९ पर्यंत प्रकल्प पुर्ण करण्यात येणार असल्याचे भूमिपुजनाच्या प्रसंगी शासनामार्फत घोषित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठाणे मेट्रो प्रकल्पासाठी निधीची उपलब्धता कोणत्या प्रकारे करण्यात येणार आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) मेट्रो मार्ग-४ या प्रकल्पाच्या पूर्णत्वाची एकूण खर्च रुपये १४,५४९ कोटी आहे आणि मेट्रो मार्ग-४ हा प्रकल्प जुलै, २०२१ पर्यंत पूर्ण करण्यास मान्यता मिळाली आहे.
(३) व (४) सदर प्रकल्पासाठी प्राधिकरणामार्फत एकूण सुमारे रुपये ६९४० कोटी, राज्य शासनामार्फत दुय्यम कर्ज सहाय्य रुपये ३६९३ कोटी तसेच जागतिक बँक/एशियन विकास बँक/जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था इत्यादी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेमार्फत कर्ज सहाय्य म्हणून रुपये ३९१६ कोटी इतका निधी उभारावा लागणार आहे. या कामाची सविस्तर निविदा काढण्यात आलेली असून पुढील प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.